SIDBI
भारतीय लघु उद्योग विकास बैंक
SMALL INDUSTRIES DEVELOPMENT BANK OF INDIA

रजिस्टर पोस्टाने

संदर्भ. क्र.4418/एफ/ए17. डिसेंबर 10, 2015

**माहितीचा अधिकार कायदा, २००५ अंतर्गत प्रथम अपिलीय अधिकारी,**
**भारतीय लघु उद्‌योग विकास बँक (सिडबी).**
**अपिल क्र.17/२०१५-१६.**

**माहिती अधिकार कायदा, २००५ कलम १९(१) नुसार श्री पुष्पानन्द नितनवरे यांनी, सिडबीच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलकाराच्या दि.२३/१०/२०१५ च्या अर्जावर दिलेला निर्णय क्र.१६९७ दि.१८/११/२०१५ च्या विरुद्ध, 'दाखल केलेले प्रथम अपिल**

---

**<u>पार्श्वभूमी</u>** : माहिती अर्जदार श्री. पुष्पानन्द नितनवरे, जुन्या उच्च न्यायालयापाठीमागे, लोहिया हॉस्पिटलच्या विरुद्ध, क्रांती नगर, औरंगाबाद ४३१००१ असा पत्ता असणारे, यांनी मुद्रा योजनेअंतर्गत माहिती विचारणारा, दि.२३/१०/२०१५ च्या त्यांच्या माहिती अर्जावर भारतीय लघु उद्‌योग विकास बँकेच्या (सिडबी) जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णय क्र.१६९७ दि.१८/११/२०१५ च्या विरुद्ध, सदरचे प्रथम अपिल दि.०५/१२/२०१५, जे ह्या कार्यालयात ०८/१२/२०१५ रोजी प्राप्त झाले, दाखल केलेले आहे. अपिलकर्ते हे त्यांच्या अर्जावर दिलेल्या निर्णयाने समाधानी नसल्याने त्यांनी मागितलेली माहिती मिळावी म्हणून सदरील अपील दाखल करुन वरील निर्णयास आव्हान दिले आहे.

**निर्णय:** मी सदरील ०५/१२/२०१५ चे अपील, अपिलदारांचा मुळ दि.२३/१०/२०१५ चा अर्ज तसेच सिडबीच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयाचे बारकाव्याने वाचन केले. या प्रकरणामध्ये अर्जदारानी मुद्रा योजने अंतर्गत शिशु, किशोर व तरुण प्रवर्गात कर्ज वितरीत करण्यासंदर्भात सर्व बँकांना कर्ज देण्या संदर्भात जे आदेश / परिपत्रक व नियमांची छायांकित प्रत मिळण्याविषयी विनंती केली आहे. तसेच मुद्रा योजने-अंतर्गत प्रत्येक बँकेला



बैंक हिन्दी में पत्राचार का स्वागत करता है ।

एमएसएमई विकास केन्द्र, सी - 11, जी ब्लॉक, बान्द्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बान्द्रा (पूर्व), मुंबई - 400 051. दूरभाष: 022-67531100, फैक्स: 022-67531377
MSME Development Centre, C-11, G-Block, Bandra-Kurla Complex, Bandra (E), Mumbai - 400 051. Tel.: 022-67531100, Fax: 022-67531377
www.sidbi.in

प्रतीवर्ष किती कर्ज योजनेचे टार्गेट -उद्दिष्ठ - देण्यात आले आहे याची सविस्तर माहिती व छायांकित प्रती साक्षांकित करून देण्याची विनंती केली होती.

सिडबीच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेला निर्णय क्र.१६९७ दि.१८/११/२०१५ हा त्यानी मुद्रा लिमीटेड कडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर दिलेला असल्याचे नमूद केले आहे. मुद्राने अर्जदारानी मागीतलेली माहिती त्यांच्याकडे नसल्याचे सांगीतल्याने जन माहिती अधिकाऱ्यांनी अर्जदारांना तसे कळवून त्याना राज्य स्तरीय बँकस कमिटी वा लीड बँक- महाराष्ट्र बँक- यांच्याकडे माहिती मागण्याविषयी सुचवले आहे. म्हणून, मुद्रा बँक नसल्याने, मुद्राकडे माहिती नसल्याने व अर्जदाराला हवी असणारी माहिती जवळच्या कोणत्याही बँकेत उपलब्ध असू शकत असल्याने, एकूण परिस्थितीत, सिडबीच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेला निर्णय क्र.१६९७ दि.१८/११/२०१५ हा चूक आहे असे म्हणता येणार नाही. सबब, हे अपिल मंजूर करता येण्यासारखे पुरेशे कारण दिसत नाही. म्हणून हे अपिल ना-मंजूर करीत आहे. येणे प्रमाणे निर्णय असा. जरूर नसतानाही अपीलदारानी सोबत पाठवलेली दहा रुपयांची भारतीय पोस्टल ऑर्डर क्र.२१फ०७५२३३ त्याना परत करावी.

ह्या निर्णयाची प्रत अर्जदाराना व सिडबी, जन माहिती अधिकाऱ्यांना पाठवण्यात यावी.

ह/-

**(शैलेन्द्र महलवार / Shailendra Mahalwar)**
**मुख्य महाप्रबंधक (विधि) व प्रथम अपीलीय प्राधिकारी**
**Chief General Manager (Legal) and**
**First Appellate Authority**

प्रत: क्र.4418A/एफ/ए17 of date

१. श्री. पुष्पानन्द नितनवरे, जुन्या उच्च न्यायालयापाठीमागे, लोहिया हॉस्पिटलच्या विरुद्ध, क्रांती नगर, औरंगाबाद ४३१००१. सोबत दहा रुपयांची भारतीय पोस्टल ऑर्डर क्र.२१फ०७५२३३ जोडली आहे.

२. श्री. उमाशंकर लाल, जनरल मेनेजर (विधि) व जन माहिती अधिकारी, सिड्बी, लखनौ।

**[एस.आर.शिंदे / S.R.Shinde]**
**सह. महाप्रबंधक (विधि) /**
**Assistant General Manager (Legal)**